**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः बदली २०१९/प्र.क्र.३७/१४ अ.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २४ मे, २०१९

## शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४), व ४ (५) अनुसार खाली नमूद केलेल्या मंत्रालयीन विभागातील **सहायक कक्ष अधिकाऱ्यांची** त्यांच्या नावासमोरील स्तंभ-५ मध्ये दर्शविलेल्या विभागात मुदतपूर्व आंतरविभागीय बदली करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | श्री/ श्रीमती | स.क.अ. नांव | सध्याचा विभाग | अन्य विभागात बदली करण्यात यावी. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीमती | अ.वि.जाधव | सार्वजनिक आरोग्य विभाग | विधि व न्याय विभाग |
| २ | श्री | सु. सु. लोंढे | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | नगर विकास विभाग |
| ३ | श्रीमती | मं.प्र.फाटक | कृषि व पदुम विभाग | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ४ | श्रीमती | रा.रा.वालावलकर | पर्यावरण विभाग | नियोजन विभाग |
| ५ | श्री | सं.सु.चव्हाण | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | जलसंपदा विभाग |
| ६ | श्री | सु.ज.जाधव | ग्राम विकास विभाग | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| ७ | श्री | प्र.चं.किर | महसूल व वन विभाग | वित्त विभाग |
| ८ | श्रीमती | नी.गं.कदम | गृह विभाग | संसदीय कार्य विभाग |
| ९ | श्री | ल.सु.माने | संसदीय कार्य विभाग | ग्राम विकास विभाग |
| १० | श्री | दे.शं.मोरे | सार्वजनिक बांधकाम विभाग | वित्त विभाग |
| ११ | श्री | सं.सु.गायकवाड | जलसंपदा विभाग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| १२ | श्रीमती | वी.जी.रानडे | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | नियोजन विभाग |
| १३ | श्री | सं.शं.पोळ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| १४ | श्री | श्री.सु.पवार | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | महिला व बाल विकास विभाग |

२. उपरोक्त नमूद कर्मचाऱ्यांना दिनांक ३१ मे २०१९ (मं.नं.) पासून रकाना क्रमांक ४ मधील नमूद विभागातून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

३. सदर आदेश हेच कार्यमुक्ततेचे आदेश असून संबंधित विभागांनी नव्याने आदेश काढण्याची आवश्यकता नाही.

४. सदर कर्मचारी दिनांक १ जून २०१९ (म.पू.) रोजी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरुद्ध शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.१८६/१६/कार्यासन १४, दिनांक २३ डिसेंबर २०१६ मधील तरतूदींनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांची बदली रद्द करणे अथवा त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणल्यास संबंधितांची कृती गैरवर्तणूक समजण्यात येईल.

६. आहरण व संवितरण अधिकारी तसेच अधिदान व लेखाधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त कर्मचाऱ्यांचे जून २०१९ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत पूर्वीच्या विभागातून अदा करण्यात येऊ नये अन्यथा त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल.

७. मंत्रालयीन विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना राज्य प्रशिक्षण धोरणानुसार बदलीनंतरच्या प्रशिक्षणाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासन परिपत्रक क्रमांक : कअनि-१११६/ प्र.क्र.३२/१४-ब, दिनांक २३.५.२०१६ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विभागात बदलीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना बदलीनंतरचे प्रशिक्षण संबंधित मंत्रालयीन विभागांनी आयोजित करावे.

८. संबंधित विभागानी सदर कर्मचारी त्यांचे विभागात रुजू झाल्याबाबतची माहिती सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) यांना त्वरीत सादर करावी.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२४११५९३२५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.05.24 12:05:26 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

सर्व सहायक कक्ष अधिकारी ( संबंधित विभागामार्फत)

**प्रत,**

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग,
३) सह/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग,
४) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, ठाकरसी हाऊस, बॅलार्ड पिअर, सुरजी वल्लभदास रोड, मुंबई-४०००१.
५) आहरण व संवितरण अधिकारी, संबंधित मंत्रालयीन विभाग,
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवड नस्ती- साप्रवि १४ अ.